दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ८२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१५ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी — जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### नागरिकांच्या मालमत्ता कराविरोधात तसेच गरजेपोटी घरांबाबत

# पनवेल उरण महाविकास आघाडीच्या नेत्यांचा पुढाकार

### मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदेंसोबत होणार बैठक

- **मुंबई-ठाण्याच्या धर्तीवर पनवेल महापालिका हद्दीतील ५०० फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता करात माफी द्यावी**
- **स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची गरजेपोटी बांधलेली घरे कायम करण्यासाठी प्रयत्नशील**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेने लादलेल्या जाचक मालमत्ता कर प्रणाली विरुद्ध पनवेल - उरण महाविकास आघाडीने याबाबत गांभीर्याने दखल घेऊन आवाज उचलला आहे. तसेच गरजेपोटी बांधलेली घरे कायम व्हावी यासाठी दिबांचे अधुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याच्या उद्देशाने सर्व लोकप्रतिनिधींसह राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन यावर निर्णय घेण्यास भाग पाडणार असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी सांगितले.

मुंबई, ठाणे येथे ५०० फुटापर्यंतच्या घर–ाना मालमत्ता कर माफ असताना पनवेल महानगरपालिकेच्यावतीने मात्र नागरिकांवर अन्यायकारक कर लादला जात आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिकेच्यावतीने लादला गेलेला मालमत्ता कर हा रद्द करण्यात यावा अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी समोर आणलीहोती. याबाबत ज्या पद्धतीने मुंबई आणि ठाण्यासारख्या शहरांमध्ये ५०० फुटांपर्यंत कराबाबत माफी देण्यात आली आहे त्या पद्धतीने पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनाही या करामध्ये माफी मिळावी, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या घरांबाबत गेले कित्येक वर्षे सिडको प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्यामुळे आरपारची लढाई सुरू झाली.

यावेळी स्व. दि.बा.पाटील यांनी येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची गरजेपोटी बांधलेली घरे कायम करण्यासाठी पाहिलेले स्वप्न आता महाविकास आघाडीच्या माध्यमातून साकार होणार आहे. त्यामुळे पनवेलसह नवीमुंबई परिसरातील प्रकल्पग्रस्त बांधवांना महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून या निर्णयाची भेट मिळणार आहे. यावेळी महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना घेऊन आपण स्वतः राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून यावर निर्णायक तोडगा काढण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास यावेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील यांनी बोलताना दिला.

मालमत्ता करासंदर्भात पनवेल महानगरपालिकेमध्ये आवाज उठविणाऱ्या महाविकास आघाडीच्या नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आली होती, मात्र तरीही न डगमगता महाविकास आघाडीच्या सर्व नगरसेवकांनी वरिष्ठ नेत्यांना सोबत घेऊन येथील नागरिकांना बसणारा भुर्दंड माफ होण्यासाठी आपला लढा कायम ठेवला. लवकरच यावर योग्य निर्णय घेण्याबाबत पनवेल उरणमधील महाविकास आघाडीच्या नेत्यांना यश मिळणार आहे.

नवी मुंबई आणि रायगड मधील पनवेल उरण पट्ट्यातील गरजेपोटी बांधलेली घरं कायम करण्याचा मानस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात बाळासाहेब थोरात, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या समवेत बैठक घेऊन गरजेपोटी घरे कायम करण्याबाबत प्रथम सर्व्हे करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. गरजेपोटी किती घरे बांधली आहेत त्याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानु–सार सिडको व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर संजय मुखर्जी यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादन अधिकारी यांना सांगून याची माहिती घेतली होती. दरम्यान गरजेपोटी बांधलेली घरे कायम ठेवण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पहिली बैठक खारघर येथे शिरीष घरत यांच्या कार्यालयामध्ये घेऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला होता. त्यानंतर कामोठे, तळोजा, कळंबोली, भींगारी, टेंभोडे अशा अनेक बैठक शेतकऱ्यांबरोबर घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या, त्याचा अहवाल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठविण्यात आला.

## निवृत्त पोलीसाने झाडल्या स्वतःच्या दोन मुलांवर गोळ्या

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

निवृत्त पोलीस अधिकाऱ्याने स्वतःच्या दोन मुलांवर गोळीबार केल्याची घटना सोमवारी ऐरोली येथे घडली. यामध्ये एकाची प्रकृती चिंताजनक असून दुसऱ्याला गोळी घासून गेली आहे. घटनेनंतर रबाळे पोलीसांनी वडिलाला पिस्तूलसह ताब्यात घेतले आहे. ऐरोली सेक्टर ३ येथे सोमवारी संध्याकाळच्या सुमारास हि घटना घडली. निवृत्त सहायक उपनिरीक्षक भगवान पाटील असे गोळीबार करणाऱ्या

पित्याचे नाव आहे. त्यांनी वसई येथे राहणाऱ्या स्वतःच्या मोठ्या मुलाला काही कामानिमित्त घरी बोलावून घेतले होते. त्यानुसार मोठा मुलगा विजय हा घरी आला असता लहान मुलगा सुजय हा देखील घरात होता. यावेळी भगवान पाटील यांनी स्वतः कडील पिस्तूल मधून दोन्ही मुलांवर गोळ्या झाडल्या. त्यामध्ये विजयच्या पोटात एक गोळी घुसली असून दुसरी गोळी खांद्यातून आरपार गेली आहे. तर सुजय याच्या पोटाला गोळी घासून गेली असल्याने तो जखमी झाला आहे.

भगवान हे निवृत्त पोलीस अधिकारी असल्याने त्यांच्याकडे परवाना असलेले पिस्तूल आहे. याच पिस्तूल मधून त्यांनी स्वतः च्या दोन्ही मुलांवर गोळीबार केला. त्यात मोठा मुलगा विजय याची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेची माहिती मिळताच रबाळे पोलीसांनी भगवान पाटील यांना राहत्या घरातून ताब्यात घेतले आहे. शिवाय गुन्ह्यासाठी वापरलेले पिस्तूल देखील जप्त केले आहे. परंतु त्यांनी कोणत्या कारणाने गोळीबार केला याची चौकशी पोलीस करत आहेत.

## नारायण राणे दिल्लीला रवाना? मोदींच्या मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची आशा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भाजपचे राज्यसभेचे खासदार नारायण राणे दिल्लीला रवाना झाले आहेत. दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचाली घडत असताना नारायण राणेंची दिल्लीवारी महत्वाची मानली जात आहे. त्यामुळे मोदींच्या मंत्रिमंडळात नारायण राणेंना स्थान मिळणार का हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.



नारायण राणे हे दिल्लीत जाऊन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांची भेट घेणार असल्याचं सांगितलं जात आहे. नारायण राणे हे एका महिन्यापूर्वी दिल्लीला जाऊन आले होते. त्यांचा मंत्रिमंडळात समावेश होईल अशी त्यांना ठाम खात्री असल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे ते स्वत:हून दिल्लीला रवाना झाले असल्याची माहिती समोर आली आहे. मंत्रिमंडळ विस्त–ारात आपल्याला स्थान मिळेल असा ठाम विश्वास राणेंना असल्याचं सांगितलं जात आहे.

नारायण राणे यांच्या मेडिकल कॉलेजच्या उद्घाटनासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे कोकणात आले होते. त्यावेळी अमित शाह यांनी नारायण राणेंच्या कामाचं तोंडभरुन कौतुक केलं होतं. तसंच त्यांनी कोकणात ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपला मिळवून दिलेल्या यशाचं बक्षीस त्यांना भाजप पक्षश्रेष्ठींकडून दिलं जाण्याची चर्चा रंगली आहे.

## संक्षिप्त...

### कोरोना रुग्णसंख्येत मोठी घट; ८,१२९ नवे रुग्ण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज नव्या करोना बाधित रुग्णांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार आज दिवसभरात ८ हजार १२९ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे. याबरोबरच बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या आज निदान झालेल्या रुग्ण संख्येहून अधिकच आहे. आज एकूण १४ हजार ७३२ इतके रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. तसेच, आज दिवसभरात २०० करोना बाधितांचा मृत्यू झाला आहे.

आजच्या २०० करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूबरोबरच राज्यातील मृत्यूदर १.९ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ५६ लाख ५४ हजार ००३ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९५.५५ टक्क्यांवर पोहोचले आहे. राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या १ लाख ४७ हजार ३५४ इतकी झाली आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**
पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.
संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**
पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.
संपर्क : ९२२३३४५२४९

# खा.सुनील तटकरे यांनी केली मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

### संबंधीत ठेकेदार व अधिकारी वर्गाला काम मार्गी लावण्याच्या दिल्या सूचना

**दै.रायगड नगरी । रोहा**

पावसाळा सुरू झाल्याने मुंबई गोवा महामार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत तर चौपदरी करणाचे काम देखील गेले कित्येक वर्षे रखडले असल्याने या समस्येची दखल घेत कोकणचे भाग्यविधाते तथा रायगडचे लोकप्रिय खा सुनील तटकरे यांनी सोमवारी यामार्गाची पाहणी करून संबंधीत ठेकेदार व अधिकारी महामार्गाचे रखडलेले बांधकाम व ठिकठिकाणी पडलेले खड्डे लवकरच पूर्ववत करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुंबई– गोवा महामार्ग हा कायम रहदारीचा मार्ग असून, या मार्गावरून रोजचं शेकडो वाहने येथून मार्गक्रमण करीत असतात. सद्यस्थितीत या मार्गाची सर्वच ठिकाणची अवस्था अत्यंत बिकट व दयनीय झाली आहे. येथे ठिकठिकाणी पडलेल्या भल्यामोठ्या खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटनाही घडत आहेत. तर या पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक प्रवाश्यांना आपला नाहक जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच महामार्गावरील असलेले छोटे पूल, पुई येथील मोरी, व कुंडलिका पूल येथे निकृष्ट दर्जाचे काम केल्याने वारंवार खड्डे पडत आहेत. या खड्ड्यात पाणी साचून राहत असल्याने याचा नाहक त्रास प्रवाशीवर्गासह वाहनचालकांना होत आहे. तर या मार्गावरील कोलाड ते खांब परिसरात बहुतेक कामे अर्धवट असल्याने या पार्श्वभूमीवर मुंबई–गोवा महामार्गाची पाहणी करण्यासाठी व आंबेवाडी नाका येथील डोकेदुखी ठरत असलेली गटार लाईन व खांब येथील महामार्ग व पादचारी पूल यांची खा. सुनील तटकरे हे कोलाड व खांब येथे प्रत्यक्ष येऊन या मार्गाची पाहणी करून संबंधीत ठेकेदार व अधिकारी वर्गाला लवकरात लवकर काम मार्गी लावून खड्डे ..../२



### सिडकोचे बांधकाम क्षेत्राला दिलासा देणारे आणखीन एक पाऊल

## मोठ्या क्षेत्रफळाचे १२ निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीकरिता उपलब्ध

> कोविड-१९ महासाथ व टाळेबंदीमुळे काहीशी मंदी आलेल्या बांधकाम क्षेत्राला चालना देण्याकरिता ही योजना निश्चितच उपयोगी ठरणार आहे. मोठ्या आकाराच्या भूखंडांवर विकसित करण्यात येणारी भव्य निवासी व वाणिज्यिक बांधकामे ही शहराच्या विकासात भर घालणारी ठरणार आहेत.
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील खारघर, कळंबोली आणि नवीन पनवेल नोडमधील एकूण १२ मोठ्या क्षेत्रफळांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली असून सदर भूखंड हे निवासी तथा वाणिज्यिक वापराकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सिडकोतर्फे नुकत्याच सुरू करण्यात आलेल्या, लहान व मध्यम आकाराच्या निवासी भूखंडांच्या विक्रीच्या योजनेस उत्तम प्रतिसाद लाभल्यानंतर सिडकोकडून सदर १२ मोठ्या क्षेत्रफळाचे निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आ–हेत. सिडकोकडून कोविड महासाथ व टाळेबंदीमुळे मंदीग्रस्त झालेल्या बांधकाम क्षेत्राला दिलासा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून सदर योजना हे त्या संदर्भातील एक नवे पाऊल आहे.

सिडकोकडून सातत्याने नवी मुंबईतील निवासी, वाणिज्यिक, सामाजिक व सांस्कृतिक उद्देशाकरिता असलेले विविध भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून दिले जातात. ..../२

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून आपत्कालीन परिस्थितीत सर्वसामान्यांना आधार : रामदास आठवले




**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याबरोबर मी संसदेत काम केले. ते स्वच्छ अंत:करणाचे व सरळ मनाचे दानशूर नेते आहेत. मी त्यांना दीर्घ आयुरारोग्य चिंतितो, असे सांगून केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले की, आपत्कालीन परिस्थितीत सामान्य माणूस आणि पत्रकार यांचीही त्यांनी दखल घेतली ही बाब महत्त्वाची आहे.

कोरोना देवदूत पुरस्काराचे मानकरी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पत्रकारांसाठी दिलेल्या अन्नधान्याच्या किटचे वाटप करताना ते बोलत होते. मुंबई मराठी पत्रकार संघात या किटचे वितरण करताना राज्यमंत्री आठवले यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक कार्याचा ..../२

## नागरिकांना विविध सुविधा देण्यासाठी ई-गव्हर्नन्स आधारित कार्यपद्धती वापरावी : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे




**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिकाऊ वाहनचालक परवाना आणि नवीन खाजगी दुचाकी व चार चाकी वाहनांची नोंदणी वितरकांमार्फत ऑनलाईन पद्धतीने करण्याची सुविधा उपलब्ध करून देऊन परिवहन विभागाने जनहिताचे एक महत्वाकांक्षी पाऊल टाकले असून भविष्यातही शासकीय विभागांना ज्या सुविधा ऑनलाईन उपलब्ध करून देणे शक्य आहे त्या उपलब्ध करून देण्यासाठी ई गव्हर्नन्सवर आधारित नवीन कार्यपद्धतीचा अवलंब करावा असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

सारथी ४.० या अद्ययावत प्रणालीअंतर्गत आधार क्रमांकांशी संलग्न असलेल्या ऑनलाईन शिकाऊ वाहनचालक परवाना तसेच वाहन नोंदणीच्या ऑनलाईन प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास परिवहन मंत्री ॲड.अनिल परब, एनआयसी, नवी दिल्लीच्या महासंचालक डॉ. नीता वर्मा, मुख्यमंत्र्यांचे तसेच विभागाचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, सचिव आबासाहेब जऱ्हाड, परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे, परिवहन उपायुक्त जितेंद्र पाटील यांच्यासह राज्यातील परिवहन विभागाचे अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र विकासात अग्रेसर असलेले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले की, नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उत्तम सेवा महाराष्ट्रात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जावा तसेच सुरक्षित प्रवासाबरोबर सर्वसामान्य जनतेला अधिकाधिक सेवा ..../२

# टक्का वाढला; पण...

पायाभूत सुविधांपासून विद्यार्थिसंख्येपर्यंत विविध निकषांच्या आधारे केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे दर वर्षी केली जाणारी देशव्यापी पाहणी उच्च शिक्षणाच्या स्थितीचा आरसा आपल्यासमोर धरणारी आहे. सन २०१९-२०२० या वर्षातील पाहणीचा नुकताच जाहीर झालेला अहवाल देशातील उच्च शिक्षणाच्या विस्तारणाऱ्या क्षितिजाचे दर्शन घडविणारा आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, अभ्यासक्रम, विद्यार्थी, शिक्षक आदींच्या संख्येत होत असलेली वाढ या अहवालात ठळकपणे समोर येते. त्याचबरोबर उच्च शिक्षणाचा परीघ विस्तारण्यासाठी आणि समाजाच्या सर्व घटकांत उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढण्यासाठी काय करायला हवे याची जाणीवही यामुळे होते; परंतु पूरक धोरणात्मक कार्यक्रम न आखल्यास असे अहवाल औपचारिक ठरण्याचा धोका असतो. १८ ते २३ या वयोगटातील मुलांचे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण (जीईआर) हा उच्च शिक्षणाच्या सार्वत्रीकरणासाठीचा कळीचा निकष आहे. गेल्या काही वर्षांपासून हे प्रमाण वाढत असून, २०२०मध्ये २७.१ टक्क्यांवर पोहोचले आहे. आधीच्या वर्षी ते २६.३ टक्के होते. तथापि, 'जीईआर'मध्ये झालेली ही ०.८ टक्के वाढ पुरेशी नाही. त्यामुळे विद्यापीठांच्या आणि महाविद्यालयांच्या संख्येत अनुक्रमे ५० आणि २४१२ यांनी झालेली वाढही म्हणूनच पुरेशी नाही. सध्या देशात १०४३ विद्यापीठे असून, ती लोकसंख्येच्या तुलनेत खूपच कमी आहेत. २०३५पर्यंत 'जीईआर' ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट राष्ट्रीय शिक्षण धोरणाने निश्चित केले आहे. त्यासाठी विद्यापीठांची आणि महाविद्यालयांचीही संख्या दुपटीने वाढण्याची गरज आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या मुलग्यांपेक्षा पूर्वीपासूनच कमी आहे; परंतु त्यांमधील अंतर कमी होत असल्याचे दिसते. सध्या ३.८५ कोटी विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असून, त्यांमध्ये १.९६ कोटी मुलगे, तर १.८९ कोटी मुली आहेत. गेल्या वर्षी एकूण विद्यार्थी ३.७४ कोटी होते, तर मुलगे आणि मुलींची संख्या अनुक्रमे १.९२ कोटी आणि १.८२ कोटी होती. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे एकूण प्रमाणात गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.४ टक्क्यांनी वाढ झाली असून, ते आता ४९ टक्क्यांवर पोहोचले आहे. गेल्या दोन दशकांत शिक्षणात मुलींनी केलेली कामगिरी पाहता, त्या नजीकच्या काळात मुलग्यांना मागे टाकण्याची शक्यता दाट आहे. 'जीईआर'चा विचार करता सध्याही मुलींचे प्रमाण (२७.३ टक्के) देशाच्या एकूण (२७.१ टक्के) आणि मुलग्यांपेक्षा (२६.९ टक्के) जास्त आहे. अनुसूचित जाती (२३.४ टक्के) आणि अनुसूचित जमाती (१८ टक्के) या समाजघटकांत हे प्रमाण वाढण्याची आवश्यकता आहे. देशाच्या एकूण उच्च शिक्षणात अनुसूचित जातींचे प्रमाण १४.७ टक्के, अनुसूचित जमातींचे प्रमाण ५.६ टक्के, इतर मागासवर्गीयांचे प्रमाण ३७ टक्के आहे. मुस्लिमांचे प्रमाण केवळ ५.५ टक्के असून, अन्य अल्पसंख्याक घटकांचे प्रमाण २.३ टक्के आहे. या सर्व समाजघटकांचे प्रमाण वाढण्यासाठी शिष्यवृत्तींपासून विविध प्रोत्साहनपर योजनांपर्यंतच्या प्रयत्नांची गरज आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्यांपैकी ७९.५ टक्के विद्यार्थी पदवीस्तरावरील आहेत. त्यातही ३२.७ टक्के विद्यार्थी कला, समाजविज्ञान आदी शाखांतील आहेत. आकर्षक करिअर देणाऱ्या व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण केवळ १३ टक्क्यांच्या घरात आहे. वाढत्या सुशिक्षित बेरोजगारीचे कारण यामध्ये दडले आहे. उच्च शिक्षणाचे खासगीकरण ही नवीन बाब नसली, तरी गेल्या दोन दशकांत त्याला आलेले धंदेवाईक स्वरूप चिंताजनक आहे. देशातील एकूण ४२,३४३ महाविद्यालयांपैकी ७८.६ टक्के महाविद्यालये खासगी असून, त्यांपैकी ६२.२ टक्के पूर्णत: विनाअनुदानित आहेत. त्यांमध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र आदी व्यावसायिक शाखांची महाविद्यालये लक्षणीय आहेत. क्रयशक्ती असणाऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांनाच तिथे प्रवेश मिळतो. कला किंवा विज्ञान, वाणिज्य या अन्य पारंपरिक शाखांकडे वळणाऱ्यांमध्ये पैसे नसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नाइलाजाने अधिक असते. वाढत्या खासगीकरणामुळे गरीब विद्यार्थ्यांसमोर फारसे पर्याय निर्माण झालेले नाहीत, ही वस्तुस्थिती ठळकपणे दिसते आहे. ती बदलण्यासाठी सरकार काय करणार हा खरा प्रश्न आहे. सन २०२०च्या आकडेवारीनुसार, देशातील १८ ते २३ या वयोगटाची लोकसंख्या १५ कोटींच्या घरात आहे. त्यांपैकी ३.८५ कोटी मुले उच्च शिक्षण घेत आहेत. उर्वरित मुलांच्या उच्च शिक्षणाचे काय, हाही प्रश्न आहे. उच्च शिक्षणावरील खर्च वाढविणे हे या सर्व प्रश्नांचे नेमके उत्तर असून, सरकारचे त्याबद्दल मौन आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही याबाबत मोघम विधानाखेरीज भाष्य नाही. वार्षिक पाहणीचा केंद्राचा उपक्रम चांगला आहे; परंतु पूरक धोरणांची जोड असली, तरच असे अहवाल अधिक अर्थपूर्ण ठरतील.

# लॉकडाऊनच्या निर्बंधामुळे बंद असलेले माथेरान सुरू करा : ग्रामस्थांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊनच्या निर्बंधामुळे बंद असलेले माथेरान पूर्वपदावर सुरू व्हावे अशी ग्रामस्थांकडून मागणी केली जात आहे. शेती, कंपन्या तसेच कारखाने वा अन्य कोणत्याही प्रकारचे उपजीविकेचे साधन उपलब्ध नसल्याने इथल्या एकंदरीत भौगोलिक परिस्थितीचे अवलोकन करता संपूर्ण जनजीवन हे पूर्णतः पर्यटनावर अवलंबून आहे. त्यामुळे या लॉक डाऊनच्या कठीण काळात नागरिकांसह, हॉटेल धारकांना, मोलमजुरांना, हातरीक्षा चालक, अश्वपालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यातच इथला व्यापारी वर्ग सुध्दा चिंतेत दिसत असून बँकांचे कर्ज, आणि मालाचे होत असलेले नुकसान यामुळे व्यापारी वर्ग पुरता हतबल झालेला आहे.

लॉज धारक तसेच छोटे छोटे दुकानदार, चप्पल, पर्स वाले दुकानदार स्टॉल धारक, रेस्टॉरंट आणि ज्यांचे हातावर पोट आहे असे कष्टकरी हातरीक्षा चालक, अश्वपालक हे मोठ्या विवंचनेत सापडले आहेत. पर्यटनावर इथलं सर्व अर्थकारण अवलंबून असल्याने कशाप्रकारे आपल्या संसाराचा राहाटगाडा चालवावा हा यक्षप्रश्न सर्वांसमोर उभा ठाकला आहे. मागील लॉक डाऊनच्या काळात आठ महिने निर्बंधामुळे नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली होती. तर पुन्हा १४ एप्रिल या ऐन



सुट्ट्यांच्या हंगामात लॉक डाऊन जाहीर करण्यात आल्यामुळे अक्षरशः नागरिक आपल्या जीवनाला कंटाळून गेले आहेत. इथे उपजीविकेचे अन्य साधन उपलब्ध नसल्याने पर्यटक आल्यास सर्वांनाच रोजगाराच्या संधी प्राप्त होतात यातूनच मुलांचे शिक्षण, लग्नकार्य आणि कुटुंबाला आधार मिळत आहे. पावसाळ्यात पर्यटकांची ईथे मांदियाळी पाहवयास मिळते यातून चांगल्या प्रकारे सर्वांनाच उत्पन्न मिळते. परंतु अशा परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या खूपच कमकुवत झालेल्या माथेरान करांना काय करावे हेच सुचत नाही. शासनाने काही नियमांवर शिथिलता आणून हे पर्यटनस्थळ लवकरच सुरू करावे अशी मागणी सातत्याने स्थानिक नागरिक करताना दिसत आहेत.

माथेरानच्या पर्यटनावर येथील जीवनमान अवलंबून असल्याने आम्ही मा जिल्हाधिकारी मॅडम यांच्याशी संपर्क करून पर्यटन सुरू होण्याबाबत चर्चा केली असून त्यांनी वरिष्ठांशी चर्चा करून लवकरच ह्यावर तोडगा काढला जाईल अशी ग्वाही दिली आहे.

**प्रशांत जाधव,**
**मुख्याधिकारी माथेरान**

या लॉक डाऊन मुळे व्यापारी वर्गाला मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. बहुतेक व्यापारी हे वयस्कर असल्याने अशा कठीण परिस्थितीत कुटुंबाच्या उदरनिर्वाह साठी मोलमजुरी करू शकत नाहीत. ईएमआई, तसेच बँकांचे कर्ज आणि मालाची एक्सपायरी संपल्यानंतर मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.जर लवकरच माथेरानची टाळेबंदी उठवली नाही तर आत्महत्या करण्याशिवाय काहीच पर्याय नाही. त्यासाठी शासनाने हे पर्यटनस्थळ लवकरात लवकर सुरू करावे.

**भास्करराव शांताराम शिंदे**
**भाजीपाला व्यापारी माथेरान**

# उरण तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी मधुकर ठाकूर यांची सर्वानुमते निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणमध्ये नव्याने स्थापन झालेल्या उरण तालुका दैनिक पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर झाली असून, पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दैनिक लोकमत, सामनाचे मधुकर ठाकूर यांची तर उपाध्यक्ष पदी नवराष्ट्रचे सूर्यकांत म्हात्रे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

नव्याने स्थापन झालेल्या उरण तालुका दैनिक पत्रकार संघाची बैठक काल उरण येथील शासकीय विश्रामगृह येथे जेष्ठ पत्रकार जगदीश तांडेल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पत्रकार संघाची सन २०२१-२०२२ साठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये दैनिक लोकमत, सामनाचे मधुकर ठाकूर यांची अध्यक्षपदी तर दैनिक नवराष्ट्र, सामनाचे सूर्यकांत म्हात्रे यांची उपाध्यक्ष पदी, दैनिक पुढारीचे जीवन केणी यांची खजिनदारपदी व दैनिक पुण्यनगरी, महानगरचे राजकुमार भगत यांची सेक्रेटरीपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

तर सदस्यपदी दै. लोकसत्ताचे जगदीश तांडेल, दै.सागर,पुढारीचे प्रदिप पाटील, रायगड टाईम्स, किल्ले रायगडचे अनंत नारंगीकर, कृषिवलचे दत्तात्रेय म्हात्रे व सकाळचे महेश भोईर, सुभाष कडू यांची निवड करण्यात आली आहे. संघाचे सल्लागार म्हणून जेष्ठ पत्रकार प्रविण पुरो यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कायदेविषयक सल्लागार म्हणून अॅड.पराग म्हात्रे व अॅड. सुमित म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. या महत्व-पूर्ण बैठकीसाठी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसह सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. कार्यकारिणीची निवड होताच दिवंगत ज्येष्ठ पत्रकार याचे कोरोनाने दुःखद निधन झाल्याने अतुल पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना उरण येथील राजकीय, सामाजिक व स्वयंसेवी संस्थांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

पत्रकार संघाचे सल्लागार म्हणून जेष्ठ पत्रकार प्रविण पुरो यांची नियुक्ती करण्यात असआली आहे. कायदेविषयक सल्लागार म्हणून अॅड.पराग म्हात्रे व अॅड सुमित म्हात्रे यांना नियुक्त करण्यात आले आहे. या सभेला नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसह पत्रकार प्रदीप पाटील, जगदीश तांडेल, अनंत नारंगीकर, दत्तात्रेय म्हात्रे, महेश भोईर व सुभाष कडू उपस्थित होते. कार्यकारिणीची निवड होताच दिवंगत पत्रकार अतुल पाटील यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## खा.सुनील तटकरे यांनी केली मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी त्यांच्या समवेत आंबेवाडी सरपंच सुरेश महाबळे, पुईचे माजी सरपंच संजय मांडलुस्कर, महिला अध्यक्षा प्रितम पाटील, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे,खांब उपसरपंच मनोज शिर्के, आंबेवाडी उपसरपंच श्रीकांत चव्हाण, युवा कार्यकर्ते राकेश शिंदे, संजय राजिवले, सुशील शिंदे, नरेंद्र जाधव, संतोष टवळे, महादेव सानप, योगेश टवळे, योगेश धामणसे, दत्ता वातेरे, सुमित जाधव, महेश टवळे तसेच आंबेवाडी व खांब ग्रा.पं.सदस्य तसेच विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोठ्या क्षेत्रफळाचे १२ निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीकरिता उपलब्ध

यामुळे शहराचा परिपूर्ण विकास साधण्याचे, महामंडळाचे उद्दिष्ट साध्य होते. सदर योजने अंतर्गत सिडकोकडून खारघर, कळंबोली व नवीन पनवेल नोडमधील एकूण १२ निवासी तथा वाणिज्यिक वापराचे भूखंड उपलब्ध करून देण्यात आले असून १९०२.४३ चौ.मी. ते ८१४३.३० चौ.मी. दरम्यानच्या क्षेत्रफळाचे हे भूखंड आहेत. सदर भूखंड हे किफायतशीर दरात उपलब्ध असून निर्वेध मालकी (क्लिअर टायटल) असणाऱ्या या भूखंडांना सिडकोची हमी आहे.

सदर योजना ही ई-निविदा व ई-लिलाव पद्धीतीने पार पडणार असून भूखंडांच्या तपशिलासह वेळापत्रक नमूद असलेली योजना पुस्तिका १५ जून २०२१ पासून सिडकोच्या https://eauction.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अर्जदारांच्या ऑनलाइन नोंदणीस १५ जून २०२१ पासून सुरुवात होणार आहे. ई-निविदा प्रक्रिया १५ जून २०२१ ते ०६ जुलै २०२१ या कालावधीत सुरू राहणार आहे. तर ८ जुलै २०२१ रोजी ई-लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे.

या योजनेमुळे अत्याधुनिक दर्जाच्या पायाभूत, सामाजिक व वाणिज्यिक सुविधा असणाऱ्या नवी मुंबईमध्ये आपले मनपसंत घर साकारण्याचे अनेकांचे स्वप्न साकार होणार आहे. उपनगरी रेल्वे, महामार्ग व अंतर्गत रस्त्यांचे जाळे, यांमुळे नवी मुंबईला उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभली आहे. नजीकच्या काळात साकार होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे नवी मुंबई थेट जगाला जोडली जाणार आहे. तसेच सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या मेट्रो प्रकल्पामुळे सार्वजनिक परिवहन सेवा अधिक सक्षम होणार आहे. नियोजित कॉर्पोरेट पार्क प्रकल्पामुळे शहराच्या वाणिज्यिक क्षमता मोठ्या प्रमाणावर वृद्धिंगत होणार आहेत.

या योजनेमुळे विकासक व बांधकाम व्यावसायिकांना नवी मुंबईसारख्या पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या शहरात, भव्य निवासी किंवा वाणिज्यिक बांधकाम विकसित करून गुंतवणूक करण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे. तरी अधिकाधिक विकासक व बांधकाम व्यावसायिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

## ई-गव्हर्नन्स आधारित कार्यपद्धती वापरावी : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

ऑनलाईन स्वरूपात देऊन त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम कसे वाचवता येतील यासाठीही प्रयत्न केले जावेत. वेगवान आणि पारदर्शी सेवा उपलब्ध करून देतांना विभागाने सुरिक्षित परिवहन सेवेला प्राधान्य द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

शिकाऊ वाहन परवाना मिळवण्यासाठी आता कार्यालयात जाण्याची गरज नाही. नवीन वाहन नोंदणीकरिता यापूर्वी वाहनांची तपासणी मोटार वाहन निरीक्षकांमार्फत करण्यात येत होती आता अशा पद्धतीने वाहन तपासण्याची आवश्यकता काढून टाकण्यात आली असून यापुढे नवीन वाहनांची वितरकाच्या स्तरावर तत्काळ नोंदणी होईल. वाहन वितरकांमार्फत सर्व कागदपत्रे डीएससी (डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट) चा उपयोग करुन ई स्वाक्षरी पद्धतीने तयार करण्यात येतील त्यामुळे कार्यालयात वाहन अथवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. वाहन वितरकांनी कर व शुल्क भरल्याक्षणी वाहन क्रमांक जारी होणार आहे. अशी माहितीही त्यांनी दिली. परिवहन आयुक्त श्री. ढाकणे यांनी ज्या सेवा ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देणे शक्य आहे त्या येत्या दोन महिन्यात उपलब्ध करून दिल्या जातील, असे आभार प्रदर्शनात सांगितले.

## आपत्कालीन परिस्थितीत सर्वसामान्यांना आधार : रामदास आठवले

मुक्तकंठाने गौरव केला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे होते. कोरोनाच्या संकटकाळात महाराष्ट्र शासनाने पत्रकारांना वाऱ्यावर सोडले असल्याची खंत वाबळे यांनी या वेळी व्यक्त केली. राज्यमंत्री आठवले यांनी पंतप्रधानांकडे पत्रकारांची बाजू मांडावी, असे आवाहन त्यांनी केले. तोच धागा पकडून आठवले म्हणाले की, कोरोना महामारीत अनेक पत्रकारांची वेतन कपात झाली असून बर्या्च पत्रकारांना नोकर्यां ना मुकावे लागले. इतर राज्यांत पत्रकारांना सवलती दिल्या जात असताना राज्य सरकार पत्रकारांची दखल का घेत नाही? असा सवाल त्यांनी केला.

पत्रकारांना अशा आपत्कालीन परिस्थितीत सरकारच्या मदतीची गरज असून त्यांना विशेष पॅकेज मिळावे यासाठी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आग्रह करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार फ्रंटलाईन वर्कर असून कोरोना काळात जीव धोक्यात घालून ते वृत्तसंकलन करतात. आघाडीवर राहून काम करणार्याद पत्रकारांनाही सरकारने फ्रंटलाइन वर्करचा दर्जा द्यावा, असे आठवले म्हणाले. या वेळी आठवले यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात काही पत्रकार, कॅमेरामन व छायाचित्रकारांना अन्नधान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. पत्रकार संघास अन्नधान्याचे किट दिल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी आभार मानले. या वेळी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सुधाकर काश्यप, कार्यवाह विष्णू सोनवणे व संयुक्त कार्यवाह खलिल गिरकर उपस्थित होते.

## ग्रामपंचायत सावळे
### ता.पनवेल, जि.रायगड
### जाहीर सूचना सन २०२१-२२

ग्रामपंचायत सावळे हद्दीतील व परिसरातील सर्व नागरिकांना /ठेकेदारांना कळविण्यात येते की, ग्रामपचायत सावळेच्या ग्रामनिधीतून विविध विकास कामे करण्यासाठी शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर टेंडर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी त्यातील अटी व नियमास पात्र असणाऱ्या अधिकृत ठेकेदारांनी टेंडर भरण्यात यावी.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत सावळे**

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सावळे**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. नारायण सदाशिव पाटील यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खाल्लील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चोदा) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतत्री जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव **मौजे - सारडे, येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं. १५/२४/ब यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर २१ आर ०० प्रति, व पोटखराबा ०० हेक्टर ०१ आर ०० प्रति, यांसी आकार रक्कम रुपये ०.५७ पैसे, यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.**

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

तारीख - १५/०६/२०२१

**सही/-**
**श्री. विनायक ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**पत्ता :- ऑफिस नं. २३०२, २३ मजला,**
**जी - स्केवेर बिझनेस पार्क,**
**सानपाडा रेल्वे स्टेशनच्या बाजूला, नवी मुंबई ४००७०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ७४००४००२७७.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही १) गणेश आत्माराम पाटील, रा.वाकडी, ता.पनवेल यांचे नावे ताबेकब्जात व वहिवाटीत असून सदर जमीन मिळकत त्याच्याकडून आमचे अशिल १) श्री.अरविंद कान्हा काकडे व २) जयेंद्र कान्हा काकडे, रा.सेक्टर ३ बेलपाडा, खारघर, ता.पनवेल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : दुंदरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गट/भूमापन नं. | हिस्सा नं. | भू-धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ५५ | ३ | -१ | ०-५०-०० | ९.४० |
| **वरील सातबारातील गणेश आत्माराम पाटील यांच्या ५० गुंठे जमीन विक्रीचा व्यवहार करीत आहेत.** | | | | |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तीचा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिलांवर नमूद केलेले मालक/ कब्जेदारा बरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल
दि.१२/०६/२०२१

**सही/-**
**अॅड.वर्षा राजेंद्र पाटील**
**गाळा नं.०६, पनवेल-दुंदरे रोड, उसर्ली बु.स्टॉप, पो.मोरबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९९२०८१८२०३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : जुई, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी रघुनाथ लक्ष्मण पाटील, रंजना लक्ष्मण पाटील, ताईबाई शशिकांत म्हात्रे, दिलखुश काशिनाथ पाटील, गुलाब नारायण पाटील, संतोष परशुराम पाटील, हिरेंद्र परशुराम पाटील, शकुंतला हरिश्रंद्र पाटील, चंद्रशेखर हरिश्चंद्र पाटील, पंकज हरिश्चंद्र पाटील, अर्चना रवींद्र पाटील, कोमल जनार्दन म्हात्रे, संदीप जनार्दन म्हात्रे, अंकेश जनार्दन म्हात्रे वरील सर्व रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जुई, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| **रघुनाथ लक्ष्मण पाटील, रंजना लक्ष्मण पाटील, ताईबाई शशिकांत म्हात्रे, दिलखुश काशिनाथ पाटील, गुलाब नारायण पाटील, संतोष परशुराम पाटील, हिरेंद्र परशुराम पाटील, शकुंतला हरिश्रंद्र पाटील, चंद्रशेखर हरिश्चंद्र पाटील, पंकज हरिश्चंद्र पाटील, अर्चना रवींद्र पाटील, कोमल जनार्दन म्हात्रे, संदीप जनार्दन म्हात्रे, अंकेश जनार्दन म्हात्रे** | १५६ | ३ ब | ०-२३-७<br>पो.ख.०-०२-३<br>एकूण ०-२६-० | २.८९ |

वरील वर्णनाच्या सदरहू मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या विकसनाच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१४/०६/२०२१
स्थळ : उरण

**सही/-**
**अॅड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८०९७१०८०६०**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६६९१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रेल्वे रुळाच्या बाजूला आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील रेल्वे रुळाच्या बाजूला एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

तालुक्यातील कोळखे गाव कातकरीवाडी येथील पनवेल-गोवा रेल्वे ट्रॅकवर पोल क्रं ७१/६ ते ७१/७ च्या मधोमध रेल्वे रुळाच्या बाजूला सदर इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. त्याचे अंदाजे वय २५ वर्षे, अंगाने सडपातळ, रंग सावळा, उंची अंदाजे ५ फूट २ इंच, डाव्या पायाचा पंजा रेल्वे ट्रॅकने कट झालेला, केस कुरळे व काळे असून अंगात काळ्या रंगाची फुल साधी पॅन्ट व सफेद रंगाचा हाफ बाह्याचा शर्ट आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक जी.ए.फडताडे यांच्याशी संपर्क साधावा.

## गडब येथे पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । पेण**


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून काराव जिल्हा परिषद राष्ट्रवादी काँग्रेस मतदारसंघाच्या वतीने गडब प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात वृक्षारोपण महाराष्ट्र राज्याच्या उद्योग राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती ताई तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, पेण शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकुर, जिल्हा चिटणीस परशुराम मोकल, काराव जिल्हा परिषद मतदार संघाचे अध्यक्ष विजय पाटील, जिल्हा नियोजन समिति निमंत्रित सदस्य बंड्याशेठ पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष श्रृंगारपुरे पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, नगरसेविका वसुधा पाटील, विकास पाटील, साजन पाटील, झेन नाईक, नरेंद्र ठाकुर, , गडब सरपंच अर्पणा कोठेकर, वडखळ सरपंच राजेश मोकल, मलेघर सरपंच शरद पाटील, माजी सरपंच योगेश पाटील, गडब माजी उपसरपंच तुलशिदास कोठेकर आत्माराम म्हात्रे, रवि म्हात्रे आदि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र गडब येथे भेट दिली. तेथील कोव्हीड परिस्थितीबाबत व येथील वैद्यकीय सुविधा बद्दल येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.विशाखा पाटील यांच्या कडुन माहिती घेतली. तसेच पेण उपजिल्हा रुग्णालयात औषध पुरवठा करण्याबाबत सिव्हील सर्जन माने यांना सूचना दिल्या.

# माथेरानमधील जुनाट वृक्ष इतिहास जमा होण्याच्या मार्गावर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानची खरी ओळख ही केवळ इथल्या गर्द वनराई मुळेच प्राप्त झाली आहे. शतकी पार केलेल्या या गावातील जुनाट वृक्ष हळूहळू दरवर्षी पावसाळ्यात अथवा अतिवृष्टीमुळे इतिहास जमा होण्याच्या मार्गावर दिसत आहेत त्यामुळे पुढील दहा वर्षाच्या कालावधीत जवळपास ही संपूर्ण जुनी वनसंपदा संपुष्टात येते की काय अशीच भीती या निमित्ताने व्यक्त केली जात आहे.

माथेरानचा शोध त्यावेळी ठाण्याचे तत्कालीन कलेक्टर ह्युज मॅलेट यांनी १८५० साली ला-वला होता. त्यावेळेस असणारी ही जुनी झाडे हळूहळू लोप पावत चाललेली दिसत आहेत. त्यातच या झाडांच्या भोवती घोड्यांना बांधले जात असल्याने घोड्यांच्या मलमुत्रामुळे बहुतांश झाडे सुकून गेली आहेत. ह्याच गर्द वनराई मुळे हवेतील शुद्ध ऑक्सिजन आणि गारव्याचा आस्वाद घेण्यासाठी देशविदेशातील पर्यटकांना हे पर्यटनस्थळ नेहमीच भुरळ घालत असते. डोंगर माथ्यावरचेच रान म्हणून या स्थळाला माथेरान असे नामकरण त्यावेळेस ह्युज मॅलेट यांनी दिले असावे. घोड्यांची संख्या मोठया प्रमाणावर असल्याने या लाल मातीत लीद मिश्रित होत असते आणि ही माती आजूबाजूला असलेल्या झाडांच्या मुळाला जाते त्यामुळे जुन्या मोठ्या जवळपास चाळीस ते पन्नास फूट उंचीच्या झाडांची मुळे कमकुवत होत आहेत आजवर जेवढी झाडे वादळी वाऱ्याने उन्मळून पडली आहेत त्या बहुतांश झाडांना मुळे दिसत नाहीत.त्यामुळे वाऱ्याच्या झोकाने ही जुनी झाडे उन्हाळ्यात सुध्दा काही ठिकाणी आपसूकच



पडताना दिसतात. मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे मोठया प्रमाणावर झाडे उन्मळून पडली होती. तर काही भागात घरे बांधतांना सुध्दा जागेच्या हव्यासापोटी लोकांनी बांधकामांस नडणा-या झाडांच्या मुळ्या छाटल्याने त्या त्या भागा-तील झाडे जमीनदोस्त झाली आहेत. दरवर्षी जुने बंगले विकत घेऊन त्याजागी नवनवीन हॉटेल्स उभारली जातात त्यांच्या बांधकामांना अडसर ठरणा-या कित्येक झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे. वनखात्याच्या जागा विकसित करण्याच्या नावावर अनेक हॉटेल्स धारकांनी जंगल भागातील रान मोकळे केले आहे.आणि हे कायम सुरूच राहणार आहे यावर अंकुश ठेवण्यासाठी संबंधित विभागाचे सक्षम नेतृत्व आजपर्यंत गावाला लाभलेले नाही हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. प्रत्येकाच्या रोमारोमात राजकारण भरलेले आहे स्वतःचे पद, पैसा आणि प्रतिष्ठा याकडे मुख्य प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या लोकांचा अधिकाधिक कल दिसत आहे.त्यामुळे अशाप्रकारे होत असलेल्या वनराईच्या नुकसानी कडे कुणी फारसे लक्ष केंद्रित करीत नाही आणि सदरची बाब गांभीर्याने सुध्दा घेतली जात नाही. नागरिक सुध्दा वेळेनुसार बघ्याची भूमिका बजावत असतात. आषाढी एकादशीला वृक्ष दिंडी काढली जाते. शालेय विद्यार्थ्यांना घेऊन वृक्षारोपण आणि त्याचे महत्व पटवून दिले जाते. तर पावसाळ्यात नगरपरिषदेच्या आणि वनखात्याच्या अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केले जातात त्यावेळी सर्वपक्षीय मंडळी न चुकता हजेरी ला-वून वृक्षाच्या प्रति असलेलं प्रेम आणि सदभावना व्यक्त करण्यात मग्न असतात. लाखो रुपयांची रोपे आणून वृक्षारोपण केले जाते परंतु त्यानंतर रोपे लावण्यात आलेल्या त्याजागेकडे कुणीही ढुंकूनही पाहत नाहीत.एका दिवसात शासनाच्या लाखो रुपयांचा चुराडा केला जातो.

संत महंतांनी वृक्ष हे आपले नातेवाईक आ-हेत सगेसोयरे आहेत असे कथन केलेले आहे. इथल्या सर्वप्रकारच्या अर्थातच सर्वसामान्य नागरिक ते प्रतिष्ठित समजली जाणारी मंडळी या सर्वांना ठाऊक आहे की, माथेरान हे केवळ इथल्या गर्द झाडीमुळे प्रसिद्ध आहे आणि या थंड शीतल स्वच्छ शुद्ध हवेच्या आधारावर पर्यटक इथे येऊन सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत त्यांच्या मुळेच सर्वांचा उदरनिर्वाह चालतो. इथे काही कंपन्या कारखाने अथवा अन्य शेती वगैरे काही नाही फक्त पर्यटन हीच शेती असून या गावाची खरी ओळख ही इथल्या गर्द झाडीवर अभिप्रेत आहे असे असताना इथल्या नागरिकांनी उत्तम प्रकारे दरवर्षी लावण्यात आलेल्या रोपांचे जतन, संवर्धन केले नाही तर आगामी काळात या गावाला निश्चितच धोक्याची घंटा आहे.

आपले माथेरान हिरवे माथेरान हे मोकळे रान म्हणण्याची वेळ येऊ नये त्यासाठी इथे कार्यरत असलेल्या वन संरक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी, वनखात्याच्या अधिकारी वर्गाने आणि नगरपरिषदेच्या लोक नियुक्त पदाधिकारी, शासकीय अधिकारी वर्गाने सुध्दा केवळ वृक्षारोपण करण्याचा दिखावा न करता या रोपांचे वाटप सर्व प्रभागातील नागरिकांना प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींना देऊन त्या रोपांचे सुयोग्यप्रकारे संगोपन आणि संवर्धन करणाऱ्या व्यक्तींना प्रमाणपत्र आणि सत्कार करण्यात येईल अशा प्रकारच्या वृक्ष स्पर्धांचे आयोजन करणे आवश्यक आहे.प्रत्येकानेच चांगल्या प्रकारे संगोपन केल्यास काही वर्षात पुन्हा एकदा ही वनराई बहरलेली दिसेल आणि इथे खऱ्या अर्थाने पर्यटन क्रांती घडेल यात शंका नाही.

# परदेशी शिक्षण, नोकरी, खेळाकरीता जाणाऱ्यांसाठी विशेष लसीकरण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १ गा-वदेवी पाडा, पनवेल याठिकाणी पनवेल महानगरपालिकने परदेशी शिक्षण, नोकरीकरीता, ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय खेळांकरीता जाणाऱ्या नागरिकांसाठी सोमवार दिनांक १४ जून पासून साठी विशेष कोविड लसीकरण सत्र सुरू करण्यात आले आहे.

परदेशी जाणाऱ्या नागरिकांना लस घेणे अनिवार्य असल्याकारणाने आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रांमध्ये पहिला डोस घेऊन २८ दिवस पुर्ण झालेल्या परदेशी जाणाऱ्या नागरिकांना दुसऱ्या डोसचे लसीकरण केले जात आहे. सकाळी १० ते दुपारी ०४ वाजेपर्यंत हे लसीकरण सुरू असणार आहे. लसीकरणासाठी येताना सोबत आधारकार्ड, पासपोर्ट, व्हिसा ,परदेशात काम करीत असल्याचे प्रमाणपत्र तसेच शिक्षणाकरिता किंवा खेळाकरिता संबधित संस्थेचे ऑफर लेटर आणावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



## नेरळचे सरपंच रावजी शिंगवा हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच म्हणून निवडून येऊन कारभार स्वीकारणारे रावजी शिंगवा यांचे आज दुर्धर आजारावर उपचार घेत असताना आज (१४ जून) सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. आदिवासी समाजातील आक्रमक आणि अभ्यासू समजले नेते जाणारे शिंगवा हे थेट सरपंच म्हणून सत्तेवर बसल्यानंतर त्यांनी नेरळ ग्रामपंचायतची विस्कटलेली आर्थिक घडी रुळावर आणली होती.



आदिवासी समाजातील बुजूर्ग कार्यकर्ते स्व. वामन ठोंबरे यांचे शिष्य म्हणून सामाजिक कार्य करता करता राजकारणात ओढले गेलेले रावजी शिंगवा यांनी आपल्या अभ्यासू आणि जनतेचे प्रश्न समजून घेण्याची असलेली कुवत लक्षात घेऊन नेरळ ग्रामपंचायतमध्ये सदस्य म्हणून भरीव काम केले होते. त्यानंतर नेरळ पंचायत समिती गणातून कर्जत पंचायत समितीची निवडणूक लढविली होती. आदिवासी समाज आणि नेरळ परिसरात शिवसेने काम करणारे रावजी शिंगवा यांनी ऑगस्ट २०१९ मध्ये झालेल्या नेरळ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या थेट सरपंचपदाची निवडणूक जिंकली होती. डिसेंबर २०१९ मध्ये सरपंचपदाचा कार्यभार हाती घेत रावजी शिंगवा यांनी नेरळ ग्रामपंचायतीला प्रथम आर्थिक संकटातून बाहेर काढले. त्यानंतर आलेल्या कोरोना संसर्ग काळात नेरळ गावातील स्वच्छतेवर भर देत नेरळमध्ये शहरी भाग असतानासुद्धा कोरोनाला रोखण्यात नेरळ ग्रामपंचायतीला यश आले होते. कोरोना काळात सतत जनतेत राहून काम करणारे सरपंच म्हणून शिंगवा यांनी आपली ओळख निर्माण केली होती. काही महिन्यांपूर्वी काविळ झाल्याने स्वतः काहीसे खचलेले रावजी शिंगवा यांना त्याच काळात आणखी एका दुर्धर आज-ाराने लक्ष्य केले.

## ७ लाख रुपये किंमतीच्या मालाचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

७ लाख रुपये किंमतीच्या मालाचा अपहार झाल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमधील जी.राईडस् फन फॅक्टरीजमध्ये घडली आहे.

गौरव अग्रवाल यांनी त्यांच्या जी.राईटस् फन फॅक्टरीजमध्ये जॉईन्ट व्हिल राईटस्, ब्रेक डान्स राईटस्, ट्रान्सफार्मर, एसी, मायक्रोओव्हव असा मिळून ७,१०,०००/- रुपये किंमतीचा माल ठेवला असता सदर कंपनीचे सुपर वायझर भरत मोटवानी यांनी सदर मालाचा अपहार केल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार तळोजा पोलीस सदर आरोपीचा शोध घेत आहेत.

## नगरसेविका सुशिला घरत यांच्या निधीतून डस्टबिनचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेच्या 'ड' प्रभाग समिती सभापती सुशिला घरत यांनी आपले शहर स्वच्छ आणि रोगांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकत त्यांच्या २०००- २००१ च्या नगरसेविका निधीमधून नवीन पनवेल येथे डस्टबिनचे वाटप केले.

कचरा रस्त्यावर फेकण्याऐवजी डस्टबिनमध्ये टाकून आपला परिसर व त्याभोवतालची स्वच्छता राखावी, असे आवाहनही या वेळी सुशिला घरत यांनी केले. या वेळी माजी नगराध्यक्ष भाजप नेते संदिप पाटील, नगरसेवक प्रकाश बिनेदार, ॲ ड. मनोज भुजबळ, ज्येष्ठ कार्यकर्ते जगदीश घरत, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, संजय भंडारी, भुषण म्हात्रे, अनंता ठाकूर, सतेज सोनावणे, संदीप नारायण पाटील, राहुल मालोतकर, अनंत रा. ठाकूर, संदीप बा. पाटील, अमित पाटील, रूपेश भुजबळ, किशोर रजपूत, एसान खान, शिवाजी त्रिभुवण, विश्वास पवार, शिवनाथ पन्हाले, प्रफुल पवार, विकास अहिर, हानुमंत मिसाल, लक्ष्मी चव्हाण, शारदा माने, माधुरी केणी, मनीषा मदाने, सीमा नरे, अनिता गायकर, वनिता पाटील, शहाबाई काशिद, रंजना पाटील, राणी लोंढे, वंदना माळी, माधुरी म्हात्रे आदी उपस्थित होते.




### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी सिद्धेश कुलदिप नाईक, रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| सिद्धेश कुलदिप नाईक | १८४ | २ | ०-२३-५<br>पो.ख.०-०१-३<br>एकूण ०-२४-८<br>पैकी ०-०८-८ | ३.६९ |

वरील वर्णनाच्या सदरहू मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या विकसनाच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
दि.१४/०६/२०२१
स्थळ : उरण

सही/-
ॲड.योगेश नामदेव म्हात्रे
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.८०९७१०८०६०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी शरद नारायण नाईक, रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शरद नारायण नाईक | १५७ | १ | ०-७६-९<br>पो.ख.०-०८-०<br>एकूण ०-८४-९<br>पैकी ०-२०-० | १३.०६ |

वरील वर्णनाच्या सदरहू मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या विकसनाच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
दि.१४/०६/२०२१
स्थळ : उरण

सही/-
ॲड.योगेश नामदेव म्हात्रे
रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.८०९७१०८०६०

श्री.भाकरे सो.कोर्ट
वकील : ॲड.सचिन अं.म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५२०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.६/७/२०२१

१) श्री.सुहास काळुराम घरत
वय : ४९ वर्षे, व्यव : धंदा
२) श्री.राजेश काळुराम घरत
वय : ४५ वर्षे, व्यव : धंदा
३) श्रीमती.कमळाबाई काळुराम घरत
वय : ७३ वर्षे, व्यव : गृहिणी
४) श्री.सुरेश काळुराम घरत
वय : ४२ वर्षे, व्यव : धंदा
अर्जदार १ ते ४ रा.मु.मठाची आळी,
घर क्र.१५३ अ, पो-न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१, २ व ४ यांचे वडील व अर्जदार क्र.३ यांचे पती अर्जदार क्र.५ यांचे सासरे व कै.काळुराम उर्फ काळ्या रामा घरत यांचा मृत्यू दि.०४/११/२००९ रोजी रा.मु.मठाची आळी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झालेल्या असून त्यांचे खालील मिळकती बाबत वास दाखला मिळणे करिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| न्हावे/०१ | ३/अ | १०४ | ००-२८-८० | |

वरील अर्जदार हे कै.काळुराम उर्फ काळ्या रामा घरत यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट
ॲड.समीना खान

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५४३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/८/२०२१

१) श्री.रेहान हसन अब्दुल रशीद मुल्ला
वय : ४५ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.रिजवान आलम अब्दुल रशीद मुल्ला
वय : ४३ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.रुहान अहमद अब्दुल रशीद मुल्ला
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.डी.६१५, नॅशनल रिजेन्सी, प्लॉट नं.४४५,
तक्का, ओल्ड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ यांचे आई मरहुम. मुनिरा खातून अब्दुल रशीद मुल्ला यांचे वारस खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | नाते | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री.रेहान हसन अब्दुल रशीद मुल्ला | मुलगा | पनवेल |
| २ | श्री.रिजवान आलम अब्दुल रशीद मुल्ला | मुलगा | पनवेल |
| ३ | रुहान अहमद अब्दुल रशीद मुल्ला | मुलगा | पनवेल |

अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई मरहुम. मुनिरा खातून अब्दुल रशीद मुल्ला यांचे मालकीचे व नावे असलेले खालील वर्णनाची सदनिका व जमीन मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | |
|---|---|
| १) | डी.६१५, नॅशनल रिजेन्सी, प्लॉट नं.४४५, तक्का, ओल्ड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड |
| २) | गाव-पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड सर्व्हे क्र.७४/३ क्षेत्र ०.१२.५० |

अर्जदार क्र.१ ते ३ ह्यांची आई मरहुम. मुनिरा खातून अब्दुल रशीद मुल्ला यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारस दाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत मरहुम. मुनिरा खातून अब्दुल रशीद मुल्ला यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळवून घेण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या अर्जदार हे मरहुम. मुनिरा खातून अब्दुल रशीद मुल्ला यांचे वारसदार असल्याबाबत व अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.६/५/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याने पालक वर्गामध्ये खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील काळुंद्रे गाव कातकरवाडी येथे राहणारी १५ वर्षीय ३ महिने वयाच्या एका मुलीला अज्ञात इसमाने तीला फुस लावून किंवा धमकी देवून पळवून नेल्याने याबाबतच तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत उसर्ली खुर्द येथे राहणारी १६ वर्षीय सहा महिन्याच्या मुलीला अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी कशाची तरी भुरळ देवून किंवा दम देवून तिला पळवून नेले आहे.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या दोन मुलींच्या अपहरणामुळे पालक वर्गामध्ये भितीचे वातावरण आहे.

## सुनेने केली सासूला हेल्मेटने मारहाण, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुनेने सासुला शिवीगाळ व हेल्मेटने मारहाण केल्याचा प्रकार हेदुटणे येथे घडला आहे. सुने विरोधात सासूने दिलेल्या तक्रारीनुसार तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरोज मदन सक्सेना (वय ७४) ह्या त्यांचा मुलगा आणि सून रचना रजत सक्सेना (४०) यांच्यासोबत एकाच घरात हेदुटणे येथील ग्रीनवुड इस्टेट येथे राहतात. यावेळी त्यांचा मुलगा व सून यांच्या बेडरूममधून काहीतरी आपटण्याचा- फोडण्याचा व शिवीगाळीचा आवाज आल्याने त्याची विचारपूस करण्यासाठी सरोज सक्सेना गेल्या असता सुनबाई रचना यांना त्यांचा राग आला.

त्यांनी सरोज यांच्या अंगावर धावत जाऊन त्यांना शिवीगाळ केली. तसेच धक्का देऊन खाली पाडले व त्यांना हेल्मेटने मारहाण केली. या मारहाणीत सरोज सक्सेना जखमी झाल्या आहेत.

## मोटरसायकल झाडाला धडकल्याने २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटरसायकल झाडाला धडकून झालेल्या अपघातात २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. समाधान बाविस्कर असे या तरुणाचे नाव आहे.

पाले खुर्द येथे राहणारा समाधान पुंडलिक बाविस्कर हा त्याच्या मित्रासोबत मोरबे धरणावर गेला होता. यावेळी मोरबे ते वावंजे कडे जाणाऱ्या रस्त्यावर त्याची मोटरसायकल झाडाला धडकली.

यात समाधान याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# डम्परच्या धडकेने पोलादपूर मटण मार्केटची इमारत उद्ध्वस्त

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

२५ व २६ जुलै २००५ या दोन दिवसांमध्ये अतिवृष्टीमुळे उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पुराच्या पाण्याखाली बुडून उध्वस्त झालेली पोलादपूर मटनमार्केटची इमारत डम्परच्या धडकेने पुन्हा उद्ध्वस्त झाली असून पोलादपूर नगरपंचायतीला सदर डम्परच्या मालकाने कोणताही प्रतिसाद न दिल्याने आजही मोडकळीस आलेली ही इमारत धोकादायक परिस्थितीत दिसून येत आहे.

पोलादपूर शिवाजीनगर भागातील पूर्वकडील गावठाणामध्ये एका इमारतीच्या बांधकामासाठी बांधकामाची सामुग्री पोहोचविणाऱ्या एका डम्परवरील ताबा सुटल्याने डम्पर मागील बाजूने वेगाने या मटन मार्केटच्या इमारतीला धडकल्यामुळे इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गेल्या महिन्यात झालेल्या या घटनेबाबत या मटनमार्केटमधील मटनविक्रेत्यांनी पोलादपूर नगरपंचायतीला माहिती दिली असून याबाबत मुख्याधिकारी विराज लबडे यांनी संबंधित डम्पर मालकासोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही डम्परमालकाने कोणताही प्रतिसाद दिला नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. दरम्यान, या इमारतीचे नुकसान करण्यास कारणीभूत असलेल्या डम्परचालक मालकाच्या



असहकारामुळे पोलादपूर शहरामध्ये आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी चर्चेचा मुद्दा विरोधकांना मिळाला आहे.

२५ व २६ जुलै २००५ या दोन दिवसांमध्ये अतिवृष्टीमुळे उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पुराच्या पाण्याखाली बुडून मटनमार्केटच्या इमारतीचे छप्पर पुर्णपणे कोलमडले होते तर लगतच्या पांजरपोळची इमारत पूर्णपणे खचली होती. त्यावेळी ग्रामपंचायत असल्याने सत्तेच्या माध्यमातून या इमारती तातडीने दुरुस्त करण्यात आल्या. याखेरिज, मच्छीमार्केटची इमारतही लगतच्या भागात उभारण्यात आली.

पोलादपूर शहरातील मच्छी व चिकन विक्रेत्यांनी या मटन व मच्छीमार्केटचा उपयोग करण्याऐवजी शहरातील आपआपल्या घरांलगत चिकन विक्रीचे तसेच रस्त्यालगत मच्छी विक्रीचे स्टॉल सुरू केल्याचे दिसून येत आहे. मात्र, केवळ बोकड,मेंढी व शेळीचे मटन विक्री करणाऱ्यांनीच या मटनमार्केटमध्ये व्यवसाय सुरू ठेवल्याने शहरात लोकवस्ती तुरळक आणि पावसाळ्यात नदीशेजारी असल्याने जैवकचरा वाहून जाण्याची सुविधा या मटनमार्केटला निसर्गतः उपलब्ध झाली आहे. या कारणास्तव पोलादपूर मटन मार्केटची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज असून संबंधित डम्परमालकाने जरी दुरुस्तीसाठी तयारी दर्शविली नाही तरी नगरपंचायतीने या इमारतीची दुरुस्ती व शक्य झाल्यास सर्वसुविधांसह नव्याने उभारणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

कोरोना संसर्ग काळात मांसाहारामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढत असल्याच्या सरकारी परिपत्रकात नमूद झाली आहे. बाजारपेठेमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी चिकन मच्छी विक्रेते बसत असल्याने त्यांना अन्य दुकानांप्रमाणे त्यांचीही दुकाने बंद ठेवावी लागत आहेत. यामुळे ही दुकाने वेगळ्या भागात एकाच ठिकाणी असल्यास बाजारपेठेचा नियम या दुकानांना लागू न राहता सकाळी विक्रीस आणलेली मच्छी अथवा कापलेले बोकड व चिकनचे मटन हे संपेपर्यंत विक्री करण्याची मुभा देता येणार आहे. पोलादपूर नगरपंचायतीकडे नुकताच ३ कोटींचा विकासनिधी उपलब्ध झाला असून यामध्ये तातडीने हे काम सुचविण्यात येऊन मटनमार्केटसह चिकन व मच्छीमार्केटची विक्री एकाच संकुलात करता येईल, अशी इमारत मंजूर करण्याची गरज या डम्परच्या धडकेने इमारत उद्ध्वस्त होण्याच्या निमित्ताने स्पष्ट झाली आहे. दरम्यान, डम्परमालकाने नगरपंचायतीच्या इमारतीचे नुकसान करूनही कोणत्याही प्रकारे सौजन्य न दाखविल्याने पोलादपूर शहरात सत्तेविरोधातील सूर आळविले जाऊ लागले आहेत.

# नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ यांच्या माध्यमातून ३५० नागरिकांचे मोफत लसीकरण

## पत्रकारांसह त्यांच्या कुटुंबियांचेही केले लसीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक तथा उत्कर्ष मित्र मंडळाचे मार्गदर्शक ॲड.मनोज भुजबळ यांच्या माध्यमातून ३५० नागरिकांचे मोफत लसीकरण करण्यात आले. सदर लसीकरण नवीन पनवेल येथील भुजबळ वाडीतील जि. प. शाळेत आयोजित करण्यात आले होते. यावेळी नवीन पनवेल येथील यशोधन सोसायटी, चंद्रभागा सोसायटी, भागीरथी सोसायटी या तीन्ही सोसायटीतील नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. तसेच सर्वसामान्य नागरिकांसह लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांचे व त्यांच्या कुटुंबियांचेही लसीकरण करण्यात आले.

कोरोनाच्या कठीण परिस्थितीत अधिकाधिक नागरिकांचे लसीकरण होणे अत्यंत महत्वाचे आहे. असे असतानाही अनेकजण अजूनही लसीकरणापासून वंचित राहिले आहेत. १८ ते ४४ या वयोगटातील अनेक नागरिकांचे अद्यापही लसीकरण झालेले नाही. अशावेळी सर्वांचे लसीकरण व्हावे या भावनेतून सदरचे लसीकरण सत्र आयोजित केले असल्याचे ॲड.मनोज भुजबळ यांनी सांगितले.

ते पुढे बोलताना म्हणाले की, सर्वप्रथम



२५० लसी खरेदी करण्याचे ठरवले होते. परंतु त्यानंतर प्रभागातील नागरिकांच्या नातेवाईकांचेही लसीकरण करण्याचा विचार मनात आला. पनवेल येथील लाईफलाईन हॉस्पिटलकडून लसी खरेदी करण्यात आल्या असून १८ ते ४४ वयोगटातील ३५० नागरिकांचे लसीकरण लाईफलाईन हॉस्पिटलच्या टीमने केले. प्रभागातील नागरिकांबरोबरच पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांनीही या लसीकरण मोहिमेचा लाभ घेतला. काही ठिकाणी पत्रकारांसाठी यापूर्वी लसीकरण मोहिमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु पत्रकारांच्या कुटुंबियांना लसीकरणाचा लाभ मिळत नव्हता. या पार्श्वभूमीवर पनवेलमधील पत्रकार संघटनांशी मनोज भुजबळ यांनी संपर्क साधून पत्रकारांच्या कुटुंबातील साधारण ५० व्यक्तींचे लसीकरण करण्याबाबत आवाहन केले होते. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण याप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून सदरची लसीकरण मोहीम आयोजित केली असल्याचे ॲड.मनोज भुजबळ यांनी सांगितले.

या लसीकरण मोहिमेस नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच पनवेल शहरातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनीही ॲड.मनोज भुजबळ यांचे आभार मानले. सदर लसीकरण मोहीमेसाठी उत्कर्ष मित्र मंडळाच्या सदस्यांनी मेहनत घेतली.

## घरफोडीत रोख रकमेसह दागिने लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद घरात अज्ञात चोरट्याने बाल्कनीच्या दरवाजाद्वारे आत प्रवेश करून बेडरूममधील लोखंडी कपाटाच्या दरवाजाचे लॉक तोडून आतील रोख रकमेसह दागिने असा मिळून जवळपास १ लाख ४० हजाराचा ऐवज चोरून नेल्याची घटना तालुक्यातील इंडिया बुल्स ग्रीन सेक्टर ३ कोनगाव येथे घडली आहे.

या ठिकाणी राहणारे सजनलाल पृथ्वीराज मिना (३३) यांचे बंद असल्याचे पाहून अज्ञात इसमाने त्यांच्या बंद घराच्या बाल्कनीच्या दरवाजाच्यावाटे घरामध्ये प्रवेश करून घरातील बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाटाचे लॉक तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम ५० हजार असा मिळून जवळपास १ लाख ४० हजाराचा ऐवज चोरून नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## साडे चव्वेचाळीस लाख रुपये किंमतीच्या ट्रेलरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साडे चव्वेचाळीस लाख रुपये किंमतीच्या ट्रेलरची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे.

ओमप्रकाश यादव (३७) यांच्या ताब्यातील टाटा कंपनीचा ट्रेलर क्र.एमएच-४६-एच-२५३९ हा माल भरुन एल ॲन्टी टी कंपनीसमोरील मुंब्रा-पनवेल जाणाऱ्या रोडवर तळोजा येथे उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्याने सदर ट्रेलर लबाडीच्या इराद्याने मालासह चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पावसाळी पर्यटन : पर्यटकांना प्रतीक्षा माथेरान अनलॉक होण्याची



**दै.रायगड नगरी । माथेरान**

नेहमीच ओढ असलेले माथेरान हे वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊन मुळे बंद करण्यात आले आहे.त्यामुळे दरवर्षी केवळ पावसाळी पर्यटनास येणारे पर्यटक आणि नवख्या पर्यटकांना सुध्दा माथेरान अनलॉक होण्याची प्रतीक्षा करीत आहेत.मुंबई पुण्यापासून अगदी जवळचे विशेष म्हणजे स्वस्त दरात मनसोक्त फिरण्यासाठी रायगड जिल्ह्यातील एकमेव पर्यटनस्थळ असल्याने इथे बाराही महिने पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते. त्यामानानाने अन्य पर्यटनस्थळाच्या तुलनेत माथेरान मधील लॉजिंगचा दर खूपच कमी आणि सर्वसामान्य लोकांना अगदी परवडण्यासारखे आहेत. केवळ दस्तुरी या मुख्य प्रवेशद्वारापासून गावात येण्यासाठी वाहतुकीची खूपच खर्चिक बाब असते त्यासाठी सुध्दा रेल्वे प्रशासनाने माफक दरात अमन लॉज स्थानका पासून माथेरान स्टेशन पर्यंत सोय उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या दरवर्षी बाराही महिने वाढताना दिसत आहे.

कोरोना काळात गेल्यावर्षी सुध्दा जवळपास आठ महिने माथेरान मध्ये लॉक डाऊन असल्यामुळे पर्यटकांना प्रवेश बंद करण्यात आला होता आणि याही वेळेस १४ एप्रिल पासून माथेरान लॉक डाऊन करण्यात आले आहे. त्यामुळे दोन महिने पर्यटकांना इथल्या पर्यटनाची मजा घेता आली नाही. रायगड जिल्हाधिकारी यांनी १५ जूनपासून माथेरान अनलॉक करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे इथे पर्यटक आपल्या लवाजम्यासह निश्चितच हजेरी लावतील यात शंका नाही.

पावसाळ्यात इथली वनराई बहरलेली असते त्यामुळे इथल्या नैसर्गिक सौंदर्यात भर पडलेली आणि मनमोहक दृश्य पाण्याचा डोंगर दऱ्याच्या उतारावरून वाहणारे जलप्रपात, आणि स्वच्छ निर्मळ निरझरांनी वाट मोकळी करून दुग्धजन्य वाहणारे पाणी पाहण्यासाठी पर्यटक आतुर झालेले असतात. संपूर्ण डोंगराने हिरवा शालू पांघरून नववधूचे रूप धारण केलेले दृश्य मनाला ताजेतवाने करते. डोंगर सुध्दा पावसाळ्यात न्हाऊन निघालेला असतो जवळपास दोन दिवस अडीच हजार फूट उंचीवरून हे सारे नयनरम्य देखावे डोळ्याचे पारणे फेडणारे असतात. पायी चालण्यासाठी खासकरूनच अनेक पर्यटक येत असतात. गर्द झाडीतून अन दाट धुक्यातून मार्ग काढताना अगदी समोरचे सुध्दा दिसत नाही याचं धुक्याची चादर अंगावर घेऊन एक वेगळाच रोमांच उभा राहतो हे प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी इथे आल्याशिवाय गत्यंतर नाही.

माथेरान मध्ये जरी धबधबे नसले तरीसुद्धा येथील शारलोट तलावाच्या मागील बाजूस दुथडी भरून वाहणाऱ्या पाण्याखाली भिजण्याची मजा सुध्दा काही औरच असते. बाजारात फिरताना एखाद्या स्टॉल वर गरमागरम मका त्याचप्रमाणे काही महत्वाच्या पॉईंट्स वर भजी खाण्यासाठी खवय्यांची गर्दी होते आणि विशेष म्हणजे माथेरानची मिनिट्रेन जरी पावसाळ्यात नेरळ ते माथेरान दरम्यान चार महिने बंद करण्यात येत असली तरीसुद्धा अमन लॉज ते माथेरान ह्या एकूण तीन किलोमीटरचा प्रवास मिनिट्रेनच्या शटल सेवेतून आपल्या बालगोपालांसह करण्याची एक वेगळीच मजा असते यासाठी पर्यटक माथेरान अनलॉक होण्याची प्रतीक्षा करीत आहेत.

## वृद्ध भाजी विक्रेत्या महिलेची रोख रक्कम लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजीच्या गोणीखाली पर्समध्ये ठेवलेले रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना पनवेल शहरातील गुणे हॉस्पिटल जवळील भाजी मार्केट येथे घडली आहे.

श्रीमती.सरस्वती राऊत (७२) या गुणे हॉस्पिटलजवळ भाजी विक्रेत्याचा व्यवसाय करतात. त्यांनी त्यांच्या जवळ साठलेली २२ हजाराची रोख रक्कम भाजीच्या गोणीखाली पर्समध्ये ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रोख रक्कम चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## पनवेल महानगरपालिका

### स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची बाह्य यंत्रणेद्वारे सशुल्क कचरा उचलून प्रक्रिया करणेकामी नोंदणीकृत व अनुभवी संस्था/एजन्सी यांचेकडून स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागवित आहेत. याबाबतची सविस्तर स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.१२/०६/२०२१ ते दि.२६/०६/२०२१ रोजी दुपारी १२.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. तरी इच्छुकांनी उपरोक्त कालावधीमध्ये पनवेल महानगरपालिकेकडे विहित नमुन्यात कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत.

सही/-
उप आयुक्त-II
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/घकवि/२५२१/प्र.क्र.-११२/१३४/२०२१, दि.११/०६/२०२१



## ग्रामपंचायत कानपोली

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.१४/०६/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कानपोली हद्दीतील जिल्हा वार्षिक योजना २०२०-२१ (२५१५) खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१५/०६/२०२१ ते २२/०६/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२३/०६/२०२१ रोजी दुपारी ११ वाजता निविदा उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कानपोली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कानपोली अंतर्गत विहिरीपासून ते सुदाम पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ६,८७,०००/- | ६८७०/- | १ महिना |

अटी व शर्ती :-

१.भरलेल्या सीलबंद निविद/कोटेशन दिनांक १५/०६/२०२१ ते २२/०६/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२.आलेल्या निविदा दि. २३/०६/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील .

३.मंजूर दुकानदारास वस्तू दिल्याशिवाय पैसे दिले जाणार नाहीत.

४.निविदा/कोटेशन पोहाचे दिनांक २२/०६/२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा /कोटेशन स्वीकारल्या जाणार नाहीत.

५.सदर जाहिरातीमधील अनुक्रमांक १ ते ९ नुसार मागविण्यात आलेल्या साहित्याचे,दुरुस्तीचे,उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.

६.नियमा प्रमाणे सर्व शासकीय भरणा करावा लागेल.

७.अधिकृत ठेकेदारांनी/दुकानदारांनी निविदा/कोटेशन न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.

८.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, बिलातून कपात केली जाईल.

९.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून/दुकानदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

१०. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील .

११.निविदा/कोटेशन मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.

१२.निविदा/कोटेशन मंजूर केल्यावर रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१३.सुरक्षा अनामत रक्कम ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा/वस्तूचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१४.निविदा/कोटेशन धारका कडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

१५.अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्वीकृत राहील.

१६.निविदा मंजूर केलेल्या प्रमाणे काम करण्यात यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.

१७.कमीत कमी दराची निविदा/कोटेशन मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

१८.निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कानपोली

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कानपोली